**"जानेवारी २०१७" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

## (अ) शासन निर्णय / अधिसूचना

- सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील १ पद संशोधन सहायक पदात रुपांतरित करण्यास दिनांक ७ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आली आहे.
- अखिल भारतीय सेवा (कार्य मुल्यांकन अहवाल) नियम २००७ प्रमाणे, दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी ४० वर्षे किंवा अधिक वय असलेल्या राज्यातील भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी सन २०१६-१७ मध्ये विहित केलेली वैद्यकिय तपासणी निश्चित केलेल्या महसूल विभागनिहाय खाजगी रुग्णालयातून करुन घेण्याच्या सूचना दिनांक ९ व १३ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केल्या आहेत.
- केंद्र शासनाच्या कार्मिक, लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालय, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली यांच्या क्रमांक-२५०१४/०६/२०१६.एआयएस.II, दिनांक ४ जानेवारी २०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील तात्पुरते निवृत्तीवेतनधारकांच्या संदर्भातील सूचना दिल्या आहेत.
- गट-अ मधील राज्य शासकीय अधिकाऱ्यांचे "कार्यमुल्यमापन अहवाल" ऑनलाईन पद्धतीने लिहिण्यासाठी ई-मेल आयडी प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक १८ जानेवारी २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांना तसेच संवर्ग नियंत्रण अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.
- दिनांक २४ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या विविध सवलतींचे पुनर्विलोकन करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.
- दिनांक २५ जानेवारी २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या सामाईक पूर्व परीक्षेमार्फत भरावयाच्या सरळसेवेच्या पदांची मागणीपत्रे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे विहित वेळेत पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक २७ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन विभागातील गट-क (अराजपत्रित) मधील लिपिक-टंकलेखक संवर्गातील सरळसेवा कोटयातील ४५० पदे वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २ जून २०१५ च्या कमाल मर्यादेतून वगळण्यात येऊन, त्यापैकी ४०५ पदे "सरळसेवा लिपिक-टंकलेखक परीक्षा २०१७" मधून व उर्वरित ४५ पदे अनुकंपा नियुक्तीने भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- दिनांक ३० जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील राज्य शासकीय / निमशासकीय / महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी अनुकंपा धोरण सुधारणे आणि त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकऱ्यांमध्ये भरती करण्यासंबंधी आढावा घेणे व त्यानुषंगाने प्रभावी उपाययोजना सुचविण्यासाठी मा.मंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीस अहवाल सादर करण्यासाठी दिनांक ३१ मे २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे

## (ब) प्रशिक्षण

- दिनांक २ जानेवारी २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील "लिपिक / लिपिक-टंकलेखकाचे सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१७" करिता अर्ज मागविण्यात आले आहे / येत आहे.

## पदोन्नती / निवडसूची / ज्येष्ठतासूची

- गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१७ रोजी तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची दिनांक ३० जानेवारी २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- मंत्रालयीन विभागातील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, लघुटंकलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१७ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची दिनांक ४ जानेवारी २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- "सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१५" मधील शिफारस प्राप्त १ उमेदवारांचे दिनांक ५ जानेवारी २०१७ च्या ज्ञापनान्वये नियतवाटप करण्यात आले. तसेच "सरळसेवा सहायक (आताचे नांव सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०१५" शिफारस प्राप्त १ उमेदवारांचे दिनांक ३ जानेवारी २०१७ च्या ज्ञापनान्वये नियतवाटप करण्यात आले.

- दिनांक ५ जानेवारी २०१७ च्या शासन आदेशान्वये सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा मधील शिफारस प्राप्त १ उमेदवाराचे मंत्रालयीन विभागात नियतवाटप करण्यात आले आहे.

- लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१५ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांचे बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयातील लिपिक-टंकलेखक पदावर दिनांक २९ सप्टेंबर २०१६ व ९ डिसेंबर २०१६ च्या शासन ज्ञापनान्वये नियतवाटप / पुर्ननियतवाटप करण्यात आले होते. आता १ उमेदवाराच्या नियतवाटप केलेल्या कार्यालयामध्ये प्रशासकीय कारणास्तव बदल करुन, दिनांक ३१ जानेवारी २०१७ च्या शासन ज्ञापनान्वये पुर्ननियतवाटप करण्यात आले आहे.

- ३ कक्ष अधिकाऱ्यांना अवर सचिव पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. २ निवडश्रेणी लघुलेखकांना वरिष्ठ स्वीय सहायक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

**(ड) <u>बदल्या / पदस्थापना</u>**

- दिनांक १२ जानेवारी २०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने लिपिक-टंकलेखक परीक्षा २०११, २०१३ व २०१४ मधून, लिपिक-टंकलेखक पदावर शिफारस केलेल्या उमेदवारांच्या गुणवत्ता क्रमांकाची सेवा अभिलेखात नोंद करण्याच्या सूचना मंत्रालयीन विभाग व बृहन्मुंबईतील कार्यालयातील संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

- अवर सचिव संवर्गातील १ व कक्ष अधिकारी संवर्गातील १ अशा दोन अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. एका कक्ष अधिकाऱ्याचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे. एका अधिकाऱ्याची पुनर्स्थापना करण्यात आली आहे. एका लिपिक-टंकलेखकाची बदली रद्द करण्यात आली आहे.

***********